| | नवी मुंबई महानगरपालिका | NAVI MUMBAI MUNCIPAL CORPORATION |
|---|---|---|
| | पामबीच जंक्शन, भुखंड क्र.1 सेक्टर.15, सी.बी.डी, बेलापूर नवी मुंबई -400 614 दुरध्वनी क्रमांक : 2756 7181 /60 /61 | Palm Beach Junction, Plot No. 1 Sector-15 A, C.B.D., Belapur NAVI MUMBAI - 400 614 |

# आदेश

**अत्यंत महत्वाचे / तातडीचे**

जा.क्र.नमुंमपा/आ.व्य/9८७ /2021.
दिनांक : 30/ 04 / 2021

संदर्भ :
1) आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005.
2) भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम,1897
3) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्र.डीएमयू-2020/सीआर-92/Dism-1, दिनांक. 13 एप्रिल 2021.
4) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./150/2021 दिनांक 14/04/2021.
5) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्र.डीएमयू-2020/सीआर-92/Dism-1, दिनांक. 20 एप्रिल 2021.
6) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./161/2021 दिनांक 20/04/2021.
7) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्र.डीएमयू-2020/सीआर-92/Dism-1, दिनांक. 21 एप्रिल 2021.
8) नमुंमपा आदेश क्र. जा.क्र.नमुंमपा/आ.व्य./167/2021 दिनांक 25/04/2021.
9) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील आदेश क्र.डीएमयू-2020/सीआर-92/Dism-1, दिनांक. 29 एप्रिल 2021.

**ज्याअर्थी,** आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, यांनी कोविड-19 विषाणूचा प्रसार थांबविण्यासाठी उक्त संदर्भ क्र. 8 च्या आदेशान्वये गुरुवार, दिनांक 22 एप्रिल 2021 रोजी रात्री 8.00 वाजल्यापासून ते दिनांक 01/05/2021 रोजी सकाळी 7.00 वाजेपर्यंत 'ब्रेक-द-चेन' अंतर्गत कोविड-19 विषाणूच्या संसर्गाची साखळी खंडीत करणेच्या दृष्टीने आदेश निर्गमित केलेले आहेत.

**आणि ज्याअर्थी,** मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी उक्त संदर्भ क्र. 9 च्या आदेशान्वये, संपूर्ण राज्यामध्ये शनिवार, दिनांक 1 मे 2021 रोजी सकाळी 7.00 वाजल्यापासून ते दिनांक 15 मे 2021 रोजी सकाळी 7.00 वाजेपर्यंत 'ब्रेक-द-चेन' अंतर्गत कोविड-19 विषाणूच्या संसर्गाची साखळी खंडीत करणेच्या दृष्टीने यापूर्वी वेळोवेळी काढलेल्या आदेशान्वये मार्गदर्शक सूचनेची अंमलबजावणी करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

**त्याअर्थी**, नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोविड-19 चा वाढता प्रादुर्भाव पाहता, साथरोग नियंत्रण अधिनियम, 1897 च्या कलम 2 अन्वये, तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 च्या सर्व संबंधित तरतूदींसह प्राप्त अधिकारांचा वापर करुन, **मी अभिजीत बांगर, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका या आदेशान्वये "ब्रेक- द- चेन" अंतर्गत कोविड-19 विषाणूच्या संसर्गाची साखळी खंडीत करणेच्या दृष्टीने शनिवार, दिनांक 1 मे 2021 रोजी सकाळी 7.00 वाजलेपासून ते शनिवार, दिनांक 15 मे 2021 रोजी सकाळी 7.00 वाजेपर्यंत संपूर्ण शहरामध्ये राज्य शासनाकडील दि. 29 एप्रिल 2021 रोजीच्या आदेशानुसार सध्याच्या निर्बंधांची अंमलबजावणी सुरु ठेवणे आवश्यक आहे, त्यास अनुसरुन सदरचे आदेश नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी निर्गमित करीत आहे.**

**यापूर्वी वेळोवेळी काढण्यात आलेले सर्व आदेश या आदेशाशी संलग्न राहतील व सदर आदेश शनिवार दिनांक 1 मे 2021 रोजी सकाळी 7:00 पासून शनिवार दिनांक 15 मे 2021 रोजी सकाळी 7: 00 वाजेपर्यंत लागू राहतील.**

सदर कालावधीत, उक्त निर्देशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती / संस्था यांचेवर साथरोग अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 51 ते 60 अन्वये तसेच, भारतीय दंड संहिता यामधील कलम 188 अन्वये कारवाई केली जाईल.

**सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.**

30/04/21

**( अभिजीत बांगर)**
**आयुक्त**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**प्रत :**

1. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
2. मा. पालकमंत्री ठाणे तथा मंत्री नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
3. मा. मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य. अधिकारी.
4. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
5. मा. पोलीस आयुक्त, नवीमुंबई.
6. जिल्हाधिकारी, ठाणे.
7. अतिरिक्त आयुक्त -1 आणि 2 नमुंमपा.
8. उप आयुक्त (मुख्यालय) आणि उप आयुक्त- परिमंडळ 1 व 2, नमुंमपा.
9. वैदयकिय आरोग्य अधिकारी, नमुंमपा.
10. सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी (सर्व 8 विभाग कार्यालय), नमुंमपा.